महाराष्ट्र शासन
आयुक्त राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय
जुने जकातघर, दुसरा मजला, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई 400023.

क्रमांक :- लेखा २०१४/ वैद्यकीय खर्च/ १३ क

वाचा :- १. शासन निर्णय, गृह विभाग, क्र. इएसटी ३३८९/४०९/पीआरओ-४, दि.७.९.१९८९.
२. शासन निर्णय, गृह विभाग, क्र. इएसटी १५९०/ ११८ (३)/ पीआरओ-४, दि.१९.११.१९९०.
३. शासन परिपत्रक, गृह विभाग, क्र. पीईओ १०००/ प्र.क्र. १७१/ इएकसरी-४, दि.९.८.२००१.

## परिपत्रक

विषय :- वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपूर्तीबाबत

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सर्व उपआयुक्त व अधीक्षक यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, विभागीय स्तरावर उपआयुक्त कार्यालय निर्माण करण्यात आलेले असून त्यांना प्रादेशिक कार्यालय प्रमुख म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. त्यामुळे सदर स्तरावर सर्व बाबींची तपासणी होणे, त्यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांवर नियंत्रण ठेवणे, अधीक्षक कार्यालय व आयुक्त कार्यालय यामध्ये समन्वय साधणे ही विभागीय उपआयुक्तांची जबाबदारी आहे. त्या अनुषंगाने विभागीय उपआयुक्तांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयातील वैद्यकीय प्रतिपूर्तीचे प्रस्ताव विभागीय उपआयुक्तामार्फत या कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे.

या कार्यालयामध्ये वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीचे प्रस्ताव अधीक्षक कार्यालयाकडून सादर केले जातात. त्यामध्ये मोठ्या प्रमाणात त्रुटी आढळून येत असल्याने वेळेचा अपव्यय होऊन संबंधित कर्मचाऱ्यास वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची रक्कम उशिरा प्रदान होते. त्यासाठी विभागीय स्तरावर वैद्यकीय खर्चाच्या प्रस्तावाची छाननी झाल्यास त्रुटींची पूर्तता सत्वर शक्य होऊ शकते. सबब, वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीचे देयक विभागीय कार्यालयामार्फत आयुक्तालयास सादर करावे. तसेच वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीचे देयक सादर करताना खालील कागदपत्रांची पडताळणी करुनच आयुक्तालयास सादर करावे.

| अ.क्र | वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीसोबत जोडावयाची कागदपत्रे |
|---|---|
| १ | परिशिष्ट 'एक' नमुना (कर्मचाऱ्याने भरावयाचा) |
| २ | जिल्हा शल्य चिकीत्सक यांचे प्रमाणपत्र |
| ३ | उपचार करणाऱ्या डॉक्टरांचे प्रमाणपत्र नमुना क/नमुना ड |
| ४ | डिसचार्ज कार्ड/तात्काळ प्रमाणपत्र |
| ५ | रुग्णालयाचे बिल व रक्कम अदा केल्याची पावती |
| ६ | वैद्यकीय खर्चाबाबत परिगणना तक्ता |
| ७ | शासन निर्णय दि.२४/०१/१९७२ नुसार औषधांमध्ये अल्कोहोल/टॉनिक नसल्याचे डॉक्टरांचे प्रमाणपत्र |
| ८ | औषधांचे उप प्रमाणके |

| | |
|---|---|
| ९ | शासन निर्णय क्र एमएजी-२००५/९/प्र.क्र.१/आरोग्य-३ दि.१९/३/२००५ अन्वये रुग्णालयातील वास्तव्याचे डॉक्टरांचे प्रमाण पत्र |
| १० | कुटूंब मर्यादित प्रमाणपत्र/कर्मचा-याची पती/ पत्नी/ आई/ वडील शासकिय/निमशासकिय किंवा खाजगी सेवेत असल्याबाबतचे / नसल्याबाबतचे प्रमाण पत्र |
| ११ | अपघात देयक असल्यास नुकसान भरपाईसाठी न्यायाधिकरण येथे दावा दाखल केलेला नसल्याचे प्रमाणपत्र |
| १२ | शासकीय व शासनमान्य रुग्णालयात उपचार घेतल्यामुळे नमुना "बी" प्रमाणपत्र |
| १३ | प्रतिपुर्तिची मागणी उपचार घेतल्यापासून १ वर्षाच्या आत सादर केल्याचे प्रमाणपत्र. |
| १४ | खाजगी अथवा शासकीय विमा कंपनीकडे दावा दाखल केला नाही याचे हमीपत्र. |
| १५ | विशेश परिचर्या प्रमाणपत्र. |
| १६ | महिला कर्मचारी /अधिकारी साठीचे प्रमाणपत्र. |

तरी अधीक्षक कार्यालयांनी वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीचे देयक विभागीय उपआयुक्त कार्यालयांना सादर करावे व उपरोक्त प्रमाणे वैद्यकीय खर्चाच्या देयकाची छानणी करुन विभागीय उपआयुक्त कार्यालयांनी वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीचा प्रस्ताव या कार्यालयास सादर करावा. तसेच वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीचे देयक सादर करताना विहीत मुदतीत (एक वर्षाच्या आत) मंजुरीसाठी या कार्यालयास सादर करण्यात यावे व सदर देयक कालबाह्य होणार नाही याची दक्षता घ्यावी. यापुढे वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीचे देयक अधीक्षक कार्यालयांनी आयुक्त कार्यालयाकडे परस्पर सादर करु नये अन्यथा ते परत पाठविण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(मा.सु.इंगळे)
सह-संचालक (लेखा),
राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,
१) सर्व विभागीय उपआयुक्त,
राज्य उत्पादन शुल्क.
२) सर्व अधीक्षक,
राज्य उत्पादन शुल्क.